भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये **Rs. 100**

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2017 ◑ SG 351469

दस्ताचा प्रकार/अनुच्छेद क्रमांक :-

दस्त नोंदणी करणार आहेत का?

नोंदणी होणार असल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचे नांव :-

मिळकतीचे वर्णन :-

मोबदला रक्कम :-

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव :-

दुसऱ्या पक्षकाराचे नांव :-

हस्ते असल्यास त्यांचे नांव व पत्ता :-

मुद्रांक शुल्क रक्कम :-

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक/दिनांक :-

मुद्रांक विक्रेत्याची सही व परवाना क्रमांक/पत्ता :-

प्राचार्य,
चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज
हुपरी

अधिकृत मुद्रांक विक्रेता

Treasury Office Hatkanangale

9 FEB 2018

सामंजस्य करार

समाजवादी प्रबोधिनी,इचलकरंजी,ता.हातकणंगले जि.कोल्हापूर व
चंद्रबाई शांताप्पा शेडुरे कॉलेज,हुपरी,ता.हातकणंगले जि.कोल्हापूर

1. प्राचार्य, डॉ. श्रीमती पार्वती भगवान पाटील
   चंद्रबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज,हुपरी
2. श्री प्रसाद माधवराव कुलकर्णी
   सरचिटणीस, समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी

वरील दोन संस्थामध्ये विदयार्थ्यांचा भाषिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक सांस्कृतिक परिघ विस्तृत व्हावा या अनुषंगाने मार्गदर्शन,प्रशिक्षण, शिबीरे,चर्चासत्र, मुक्त संवाद, गटचर्चा, रॅली व ग्रंथ देवाण–घेवाण तसेच सल्ला व सेवा एकमेकांना पूरक ठरेल अशा पध्दतीने दोन्ही संस्थानी एकमेकांना मदत करणेसाठी सदर करार करणेत येत आहे. हा करार दिनांक 1 मार्च 2018 ते फेब्रुवारी 2023 या पाच वर्षांच्या कालावधी करीता करणेत येत आहे. या करारातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत–

1. समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजीच्या वतीने आयोजित व्याख्याने,चर्चासत्र,शिबीर इ. उपक्रमामध्ये चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेजमधील निवडक प्राध्यापक व विदयार्थ्यांनी सहभाग घेणे.

2. चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज हुपरीमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या व्याख्याने,चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषदा, गटचर्चा, परिसंवाद इ. उपक्रमांकरीता साधनव्यक्ती उपलब्ध करून देणेकरीता समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजीने सहाय्यता करणे, साधनव्यक्तीचे मानधन आयोजक संस्थेने देणे.

3. महिविदयालयाचे ग्रंथालय व समाजवादी प्रबोधिनीच्या ग्रंथालयातील ग्रंथांचे आवश्यक्तेनुसार आदान–प्रदान करणे.

4. "प्रबोधन प्रकाशन ज्योती" या समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी संलग्नित मासिकाकरीता लेखन, प्रूफ, भाषांतर, वर्गणीदारांची संख्या वाढविणे, जाहिरात इ. करीता महाविदयालयातील सर्व घटकांनी मदत करणे.

5. ग्रंथ संपदेची परस्पर देवाण–घेवाण करीत असताना ग्रंथास हानी झाल्यास संबंधित संस्थेंने ती हानी भरून दयावयाची आहे.

6. प्रबोधनपर व्याख्यानांचे ,चर्चासत्राचे, शिबीरांचे आयोजन करताना दोन्ही संस्था मधील विचारविनीमयाने ज्याठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल तेथे संबंधीत संस्थेंने हॉल, स्टेज–व्यवस्था, पत्रिका, मानधन,स्टेशनरी, संगणक, प्रोजेक्टर इ. सुविधा पुरविण्याच्या आहेत. मनुष्यबळ, प्रसिध्दी व इतर कामामध्ये आयोजक संस्थेस परस्परांनी मदत करावयाची आहे.

7. महाविदयालयातील भाषा विभागाच्या वतीने चालविण्यात येणारे"ट्रान्सलेशन ॲन्ड कम्युनिकेशन स्किल"ग्रामिण पत्रकारीता : जनसंवाद व संपर्क,स्पर्धा परीक्षा, गांधी विचार संस्कार परीक्षा इ. शॉर्ट टर्म कोर्सकरीता समाजवादी प्रबोधिनीने सैंदधांतिक व व्यवहारीक पातळीवर तसेच प्लेसमेंटकरीता सहकार्य करावयाचे आहे.

8. हुपरी व इचलकरंजी परिसरातील ग्रंथालये तसेच युवक मंडळे, सामाजिक संस्था इत्यादींना वैचारिक दिशादिग्दर्शन करण्याकरीता दोन्ही संस्थां प्रयत्नशील राहतील. विशेषत: राजकीय व पर्यावरणीय साक्षरता तसेच सामाजिक , सांस्कृतिक, धार्मिक सलोखा व भाषिक कौशल्ये देण्याकरीता दोन्ही संस्थांनी प्रयत्न करणेचे आहेत.

वरील करारानुसार दोन्ही संस्थांनी परस्पर व्यवहार करणेचे आज दिनांक 28.2.2018 रोजी ठरले. हा करार पाच वर्षाकरीता असून तदनंतर यापध्दतीचा करार करावयाचा असल्यास त्याचे नुतनीकरण करावे.

(प्रसाद माधवराव कुलकर्णी)
सरचिटणीस
समाजवादी प्रबोधिनी,इचलकरंजी

(श्रीमती डॉ. पी.बी.पाटील)
प्राचार्य
चंद्रबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज,हुपरी

साक्षीदार–

1. प्रा. डॉ. एस.एम.साठे– इंग्रजी विभागप्रमुख
2. प्रा. एम.एस.मुजावर– हिंदी विभागप्रमुख
3. प्रा.बी.बी.जाधव–मराठी विभागप्रमुख
4. प्रा डॉ.एस.जे.किर्दत– समन्वयक–स्पर्धा परीक्षा व विवेकवाहिनी